पिंपरी-चिंचवडमध्ये होणार नाट्य संकुल - अजित पवार

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in सोमवार दिनांक 25/08/2025 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 190 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com



# राज्याच्या प्रत्येक तालुक्यातील 10 गावे स्मार्ट, इंटेलिजंट - मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



नागपूर : आत्मनिर्भर भारताच्या दिशेने पुढे जात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून शेती, आरोग्य, शिक्षण आदी महत्वाच्या सुविधा सातनवरी गावात उपलब्ध करून देत समृद्ध गावाचे रोल मॉडेल उभे राहिले असून लवकरच राज्याच्या प्रत्येक तालुक्यातील १० गावे स्मार्ट व इंटेलिजंट करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. याद्वारे पहिल्या टप्प्यात राज्यातील जवळपास ३ हजार ५०० गावे स्मार्ट व इंटेलिजंट करणार असल्याचे प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

केंद्रीय दूरसंचार मंत्रालयांतर्गत कार्यरत व्हाईस ऑफ इंडियन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी एंटरप्रायजेसने (व्हाईस) देशांतर्गत २४ कंपन्यांच्या संघटनांसोबत एकत्र येत राज्य शासन व नागपूर जिल्हा प्रशासनाच्या मदतीने सातनवरी गावात आधुनिक तंत्रज्ञान आधारित सेवा उपलब्ध करून देत या गावाला देशातील पहिले स्मार्ट व इंटेलिजंट गाव बनविले आहे. प्रायोगिक तत्वावर उभारण्यात आलेल्या या स्मार्ट व इंटेलिजंट गावाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी महसूल तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार चरणसिंह ठाकूर, सातनवरी गावाच्या सरपंच वैशाली चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी आदी उपस्थित होते.

तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून गावात सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सातनवरी गावात सुरू झालेला देशातील स्मार्ट व इंटेलिजंट गावाचा शुभारंभ हे एक क्रांतीकारक पाऊल असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. गावांना सक्षम करण्याच्या दिशेने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीतून देशातील गावागावांमध्ये भारतनेट प्रकल्प राबविला गेला. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याची यशस्वी अंमलबजावणी राज्यात झाली व दुसऱ्या टप्प्याची सुरूवातही झाली. याच धर्तीवर महाराष्ट्रात महानेट हा प्रकल्प राबविण्यात आला. आता याच प्रवासात भारतीय तंत्रज्ञान कंपन्यांच्या माध्यमातून आत्मनिर्भर भारताच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकत गावांमध्ये आरोग्य, शिक्षणासोबतच स्मार्ट सिंचन, ड्रोनद्वारे किटकनाशके व खत फवारणी, बँक ऑन व्हिल, स्मार्ट टेहळणी अशा एकूण 18 सेवा कमी वेळात उपलब्ध करून देत सातनवरी हे देशातील पहिले स्मार्ट व इंटेलिजंट गाव ठरले आहे.या गावातील शेतकरी ड्रोन व सेंसर आदींचा उपयोग करून माती परिक्षण, फवारणी, खते आदींचे योग्य नियोजन करून शेतीचा उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढवू शकतील. गावातील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता सुधारल्याने गावकऱ्यांचे आरोग्य सुधारेल. टेलिमेडिसिन आदींचा उपयोग होऊन गावातच आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध होणार आहे. गावात प्राथमिक शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्ता व स्मार्ट शिक्षणाचा उपयोग होऊन वैश्विक ज्ञान विद्यार्थ्यांना मिळेल व सातनवरी गाव लवकरच देशात एक रोल मॉडेल म्हणून नावारूपाला येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. तसेच या सेवांचा योग्य प्रकारे वापर करत येत्या वर्षात सातनवरी गावाने देशातील सर्वात प्रगतीशील गाव म्हणून नावलौकीक मिळावावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. सातनवरी गावाने अल्पावधीतच स्मार्ट व इंटेलिजंट गाव बनण्याचा बहूमान मिळवला असून लवकरच राज्य शासनाच्या वतीने प्रत्येक तालुक्यात 10 गावे स्मार्ट व इंटेलिजंट करण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात राज्यातील जवळपास 3 हजार 500 गावे स्मार्ट व इंटेलिजंट करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

# द्राक्ष बागाईतदार संघाच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी शासन सकारात्मक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन

पुणे : शेतकऱ्यांच्या भल्यासाठी राज्य शासन काम करत आहे. द्राक्ष उत्पादकांमुळे महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने समृद्धी आली आहे. द्राक्ष बागाईतदार संघाच्या विविध मागण्या पूर्ण करण्यासाठी शासन सकारात्मक असून त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाच्या ६५ व्या वार्षिक अधिवेशनाचे व द्राक्ष परिसंवादाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. हॉटेल टिपटॉप इंटरनॅशनल, वाकड, पुणे येथे आयोजित कार्यक्रमास कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, आमदार शंकरराव मांडेकर, केंद्रीय फलोत्पादन उपसचिव संजय सिंह, कृषी आयुक्त हेमंत वसेकर, महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाचे अध्यक्ष कैलास भोसले, पुणे एनआरसीजीचे संचालक कौशिक बॅनर्जी, चिली देशाचे द्राक्ष शास्त्रज्ञ कार्लोस फ्लोडी, संघाचे उपाध्यक्ष मारुती चव्हाण, संघाचे खजिनदार शिवाजीराव पवार, मध्यवर्ती विज्ञान समितीचे अध्यक्ष अभिषेक कांचन आदी उपस्थित होते.उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, द्राक्ष बागाईतदार संघाच्या अध्यक्षांनी मांडलेल्या विविध मागण्या पूर्ण करण्यासाठी लवकरच मुंबईत बैठक घेऊन त्यावर चर्चा करून सकारात्मक निर्णय घेऊ.

केंद्रीय स्तरावरील मागण्या संदर्भात केंद्रीय मंत्र्यांशी चर्चा करून दिल्लीत केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांसोबत बैठक लावण्यात येईल.

मागण्या पूर्ण करण्यासंदर्भात राज्य शासनाकडून अडचण येणार नाही, असे आश्वासन त्यांनी दिले.राज्यातील गरीबातल्या गरीब माणसाची प्रगती झाली पाहिजे यासाठी शासन काम करीत आहे.

शेतकरी हीच आपली जात असून आपण शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचाराने पुढे जात आहोत. शेतकऱ्यांना समाधानी करण्यासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत विविध योजना आणत असतो; पण त्यामुळे बाजारातील स्पर्धेकडे दुर्लक्ष होऊ नये, असे मत त्यांनी व्यक्त केले.

# दिशा परिवाराच्या वतीने 225 गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे: "चांगले काम करणाऱ्या संस्थांना पाठबळ देण्याच्या उद्देशाने कंपन्यांकडून दोन टक्के सीएसआर निधीची तरतूद आहे. मात्र, मोठ्या कंपन्या स्वत:च मंदिर, ट्रस्ट, शाळा, सामाजिक संस्था सुरु करतात. त्यामध्ये सीएसआरचा निधी वळवितात. परिणामी गरजू संस्थांना पैशांची तूट भासते. पैशांअभावी कोणाचे शिक्षण किंवा चांगल्या सामाजिक कार्यात खंड पडू नये," असे प्रतिपादन पद्मश्री जितेंद्र सिंह शंटी यांनी केले. जाती-धर्माच्या भिंती भेदून प्रत्येकाला चांगले शिक्षण मिळावे, या उदात्त हेतूने सुरु असलेला दिशा परिवाराचा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दिशा परिवार चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने १९ वा शैक्षणिक शिष्यवृत्ती व दिशा परिवार सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार वितरण सोहळ्यात जितेंद्र सिंह शंटी बोलत होते. नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात झालेल्या सोहळ्यात २२५ गरजू विद्यार्थ्यांना देणगीदारांच्याच हस्ते शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. यंदाचा दिशा परिवार सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार 'दादाची शाळा' या उपक्रमाचे संस्थापक अभिजित पोखरणीकर यांना प्रदान करण्यात आला. मराठवाडा मित्र मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. भाऊसाहेब जाधव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रसंगी उद्योजक रावसाहेब घुगे, प्रभातचे सरव्यवस्थापक बी. एल. स्वामी, दिशा परिवाराचे अध्यक्ष माणिकराव गोते, कार्याध्यक्ष राजाभाऊ चव्हाण, पौर्णिमा जानोरकर, मकरंद कुलकर्णी, नंदकिशोर रोजेकर, अरुण कुलकर्णी, चिन्मय कुलकर्णी यांच्यासह अन्य पदाधिकारी, विद्यार्थी, देणगीदार उपस्थित होते.जितेंद्र सिंह शंटी म्हणाले, "देशसेवा व मानवतेसाठी चांगले कार्य करणाऱ्या संस्था पैशाअभावी बंद पडू नयेत. त्यांना मुबलक सीएसआर निधी उपलब्ध व्हावा, यासाठी देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडे पाठपुरावा सुरु आहे. गरजूपर्यंत हा निधी पोहोचावा. सामाजिक संस्थांना देणगी दिल्यानंतर गरजूपर्यंत पैसे पोहोचतो की नाही, अशी शंका असते. अशा स्थितीत दिशा परिवाराचे कार्य पारदर्शी पद्धतीने सुरु असून, ते कौतुकास पात्र आहेत."

"कोरोना काळात जवळचे नातेवाईक सोबत येत नव्हते. कुठला नेता नाही, प्रशासन, हॉस्पिटल सहकार्याला नाही. अशावेळी कोणताही जात-धर्म न पाहता चार हजार २६६ जणांवर मोफत अंत्यसंस्कार केले. आजवर ७० हजारांहून अधिक बेवारस मृतांचे अंत्यसंस्कार केले. त्याची दखल घेत केंद्र सरकारने पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले. ज्याठिकाणी सरकारने काम करायला हवे, तिथे हा सरदार काम करीत होता, याचे समाधान आहे," असे त्यांनी नमूद केले.भाऊसाहेब जाधव म्हणाले, "हजारो विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे काम दिशा परिवाराने केले आहे. आज त्यातील अनेक मुले मिळालेल्या मदतीची परतफेड करण्याची संधी घेत आहेत. दिशा परिवारात दाते व मदत घेणारे गरजू विद्यार्थी हे सर्व जाती-धर्माचे आहेत. त्यामुळे इथे केवळ शिष्यवृत्तीच दिली जात नाही, तर समाजाला एकसंध ठेवण्याची भावना रुजवली जाते."

रावसाहेब घुगे म्हणाले, "राज्य सरकारच्या प्रशासन यंत्रणेत मोठे दोष आहेत. चूक नसताना आणि योग्य पद्धतीने काम करीत असतानाही यंत्रणेकडून सहकार्य मिळत नाही. समाजात ८० टक्के लोक चांगले आहेत. त्यांना एकत्र आणावे लागेल. त्यांच्या सहकार्यातून मोठी चळवळ पुढे येईल. त्यातून मोठी क्रांती करणे शक्य आहे. सीएसआरचा वंचित मुलांच्या शिक्षणासाठी वापरला जावा."

यावेळी पोखरणीकर यांनी पुरस्कारामुळे आणखी चांगले काम करण्याचा प्रेरणा मिळाली आणि यापुढे सामाजिक कार्य सुरुच ठेवणार असल्याचे सांगितले. दिशा परिवारामुळे जीवनाला दिशा मिळाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. राजाभाऊ चव्हाण यांनी दिशा परिवाराच्या कार्याविषयी प्रास्ताविकात माहिती दिली. बी. एल.स्वामी यांनी आभार मानले.

# पीसीसीओईआर येथे पाचव्या एशियाकॉन -25 आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी ; भारतात ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञानाचा विकास आणि वापर केला जात आहे. समाजोन्नतीसाठी आवश्यक असणाऱ्या तंत्रज्ञानाचा विकास केल्यामुळे लोक कल्याणकारी व्यवस्था निर्माण करण्यासाठी मदत मिळते. गरजेनुसार तंत्रज्ञान विकसित होत असून यामुळे देश प्रगतीपथाकडे वाटचाल करीत आहे. नव तंत्रज्ञान विकसित भारतासाठी उपयुक्त ठरते आहे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड रिसर्च (पीसीसीओईआर) आणि आयईईई यांच्या सहयोगाने आयोजित केलेल्या पाचव्या 'एशियाकॉन -२५' आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन डॉ. गोसावी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सावी इन्फ्रास्ट्रक्चरचे संचालक डॉ. विकास पाटील, आयईईईचे डॉ. शशिकांत पाटील, कॅपजेमिनीचे मोनिश के., उद्योजक नरेंद्र लांडगे, पीसीसीओईआरचे संचालक डॉ. हरिश तिवारी, डॉ. राहुल मापारी, डॉ. विजयालक्ष्मी कुंभार आदी उपस्थित होते. यावेळी 'एशियाकॉन' स्मरणिकेचे प्रकाशन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. या परिषदेसाठी सोळा देशांमधून आलेल्या दोन हजार २६२ प्रवेशिकां मधून २५६ शोध निबंधांचे सादरीकरण करण्यात आले, असे डॉ.राहुल मापारी यांनी प्रास्ताविकात सांगितले.अशा प्रकारच्या परिषदे मधून संशोधकांना विज्ञान तंत्रज्ञानातील प्रगतीची माहिती होते. नवकल्पना, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, विचारांची देवाणघेवाण होते. पुढील वाटचालीसाठी योग्य दिशा मिळते. आव्हानांचा सामना करत त्यावर मात करा, असे मार्गदर्शन डॉ. विकास पाटील यांनी केले.

आयईईई'ने संशोधकांना व्यासपीठ निर्माण करून दिले आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर संस्थेचा नावलौकिक खूप मोठा आहे. पीसीईटीच्या सहयोगाने पाच वर्षांपासून आंतरराष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन केले जात आहे, यांचा आनंद आणि समाधान आहे असे डॉ.शशिकांत पाटील म्हणाले.

डॉ. हरिश तिवारी यांनी परिषदेच्या आयोजनाचा उद्देश स्पष्ट केला. यावेळी विविध विद्याशाखेचे प्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. मैथिली अंधारे यांनी केले. आभार डॉ. संतोष रणदिवे यांनी मानले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करून परिषदेसाठी शुभेच्छा दिल्या

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
सोमवार दिनांक 25/08/२०25
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# कै. मनीषा भाऊसाहेब भोईर स्मृती नाट्यछटा स्पर्धेचे बक्षीस वितरण उत्साहात

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



चिंचवड : बालरंगभूमी परिषद पुणे जिल्हा आणि पिंपरी चिंचवड शाखेच्या वतीने आयोजित 'कै. मनीषा भाऊसाहेब भोईर स्मृती नाट्यछटा स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे बक्षीस वितरण अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भोईर यांच्या हस्ते संपन्न झाले.यावेळी बोलताना भाऊसाहेब भोईर म्हणाले की, या स्पर्धेमध्ये सहभागी झालेले सर्वच बालकलाकारांनी कौतुकास्पद कामगिरी केली आहे.

त्यांच्या कलेला मिळालेले हे प्रोत्साहन खऱ्या अर्थाने त्यांची कार्याची कलेची पोचपावती आहे. तसेच या स्पर्धेत सहभागी झालेले सर्व बालकलाकार आणि विजेत्यांचे भाऊसाहेब भोईर यांनी अभिनंदन केले आहे.याप्रसंगी बालरंग भूमी परिषदेचे उपाध्यक्ष अरुण पटवर्धन, सल्लागार हनुमंत कुबडे, नारायण करपे, प्रा. रामदास थिटे, पुणे जिल्हा शाखा अध्यक्षा दीपाली (माई) शेळके, पिंपरी चिंचवड शाखा अध्यक्षा गौरी लोंढे, अभिनेते डॉ. संजीवकुमार पाटील, मनोज डाळिंबकर, बालकलाकार, पालक वर्ग आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# सायबर चोरट्यांकडून 37 लाखांची फसवणूक

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पुणे : सायबर चोरट्यांनी वेगवेगळ्या घटनेत ज्येष्ठ नागरिकासह तिघांची ३७ लाखांची फसवणूक केली. याबाबत एका महिलेने काळेपडळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार महिला हडपसर-काळेपडळ परिसरात राहायला आहेत.सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला होता. घरातून ऑनलाइन पद्धतीने कामाची संधी, असे आमिष चोरट्यांनी त्यांना दाखविले होते. समाज माध्यमातील जाहिराती, तसेच चित्रफितींना दर्शक पसंती मिळवून दिल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखविण्यात आले होते.

सुरुवातीला महिलेला चोरट्यांनी एक काम दिले. ऑनलाइन पद्धतीने महिलेने हे काम पूर्ण केल्यानंतर तिच्या खात्यात परताव्यापोटी काही रक्कम चोरट्यांनी जमा केली. त्यामुळे महिलेचा विश्वास बसला. चोरट्यांनी तिला अशा प्रकारच्या कामात (ऑनलाइन टास्क) पैसे गुंतविल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखविले.त्यानंतर महिलेने चोरट्यांच्या खात्यात वेळोवेळी १६ लाख ८४ हजार ८०० रुपये गुंतविले. चोरट्यांच्या खात्यात पैसे जमा करण्यात आले. त्यानंतर चोरट्यांनी महिलेशी संपर्क साधणे बंद केले. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. सहायक पोलीस निरीक्षक रत्नदीप गायकवाड तपास करत आहेत.

नोकरीच्या आमिषाने चोरट्यांनी एकाची १२ लाख ५७ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याबाबत एकाने मुंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार घोरपडी गाव परिसरात राहायला आहेत. सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संदेश पाठविला होता. परदेशात नोकरीचे आमिष चोरट्यांनी त्यांना दाखविले होते.नोकरीच्या आमिषाने चोरट्यांनी तक्रारदाराला ऑनलाइन पद्धतीने पैसे जमा करण्यास सांगितले. तक्रारदाराने चोरट्यांच्या खात्यात वेळोवेळी १२ लाख ५७ हजार रुपये जमा केले. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर त्यांनी नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक निकम तपास करत आहेत.

# जागतिक तिरंदाजी स्पर्धेत महाराष्ट्रातील मुलींची अभिमानास्पद कामगिरी

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : कॅनडातील विनीपेग येथे झालेल्या युवा जागतिक अजिंक्यपद तिरंदाजी स्पर्धेत महाराष्ट्रातील मुलींनी अभिमानास्पद कामगिरी केली आहे. या स्पर्धेत प्रितिका प्रदीप हिने दोन रौप्य पदके, गाथा आनंदराव खडके आणि शर्वरी सोमनाथ शेंडे यांनी कांस्य पदक पटकावत महाराष्ट्राचा गौरव वाढविला आहे.

विशेष म्हणजे गाथा आणि शर्वरी यांनी अमेरिकेच्या संघावर अचूक निशाणा साधत एकतर्फी विजय मिळविला आहे. या यशाबद्दल क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी खेळाडू व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले आहे.क्रीडा मंत्री ॲड. कोकाटे आपल्या संदेशात म्हणाले की, अचूक निशाणा साधून पदकावर कोरलेले भारताचे नाव हा देशवासीय व महाराष्ट्रासाठी अभिमानाचा क्षण आहे. हे यश अथक परिश्रम, मेहनत, संयम व जिद्दीचे मूर्तिमंत उदाहरण आहे.

खेळाडूंच्या उज्ज्वल भविष्यासाठी शासन कटिबद्ध आहे. आपली ही ऐतिहासिक कामगिरी पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल.

या विजयामुळे महाराष्ट्रातील युवा खेळाडूंना नवे प्रेरणास्थान मिळाले असून राज्य शासन त्यांना सर्वोतोपरी सहकार्य करणार असल्याचेही मंत्री ॲड. कोकाटे यांनी नमूद केले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सोमवार दिनांक 25/08/2०25

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पिंपरी-चिंचवडमध्ये होणार नाट्य संकुल

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




चिंचवड: नाटक हे मराठी माणसांचा श्वास आहे, मराठी माणसांनी संस्कृती जपली आहे. कामगार, औद्योगिक नगरी अशी ओळख असलेल्या पिंपरी चिंचवड शहराचा सांस्कृतिक नगरी म्हणून झपाट्याने विकास होत आहे, यामध्ये नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांचा मोलाचा वाटा आहे,

मी त्यांनी मागणी केल्या प्रमाणे शहरात नाट्य संकुल करण्यास अनुकूल असून त्यांनी सोमवारी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची भेट घ्यावी, मी त्यांना फोनवर बोलून जागा उपलब्ध करून देण्याची सूचना देतो असे सांगत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शहरात नाट्य संकुल उभारण्याची घोषणा केली.अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखेच्या २९ व्या वर्धापन दिनानिमित्त प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृहात आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत होते. या प्रसंगी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मध्यवर्ती संघटना, मुंबई चे विश्वस्त अशोक हांडे हे या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष अजितदादा होते मात्र संमेलनाला येऊ न शकल्यामुळे त्यांचा मध्यवर्ती शाखेचे विश्वस्त अशोक हांडे,उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर आणि नियामक मंडळाचे सदस्य सुहास जोशी यांच्या हस्ते त्यांना स्मृती चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.या प्रसंगी 'कै. बालगंधर्व पुरस्कार' – श्री ज्ञानेश पेंढारकर (ज्येष्ठ नाट्य संगीतकार), आचार्य प्र.के. अत्रे पुरस्कार' – श्री संकर्षण कऱ्हाडे (अभिनेता,कवी, लेखक, निवेदक), 'कै. अरुण सरनाईक पुरस्कार' – प्रवीण तरडे (अभिनेता, लेखक, दिग्दर्शक) , 'कै.स्मिता पाटील पुरस्कार' - स्पृहा जोशी (कवयित्री, अभिनेत्री, निवेदिका) , 'कै. जयवंत दळवी पुरस्कार' – अरविंद जगताप (नाट्य-सिने-मालिका लेखक) आणि ज्येष्ठ शास्त्रीय गायक पं. सुरेश साखवळकर यांचा नाट्य परिषद मध्यवर्तीचा'जीवन गौरव पुरस्कार' मिळाल्यानिमित्त यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. तसेच सुवर्णा काळे, रति देशमुख, संदीप उर्फ जम्माड देशमुख, संदीप उर्फ बबलू जगदाळे, सोमनाथ तरटे,राष्ट्रीय खेळाडू प्रांजल जाधव यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच राज्यनाट्य स्पर्धा २०२४ चे पुरस्कार विजेत्यांनाही यावेळी सन्मानित करण्यात आले यामध्ये मनोहर जुवाटकर,कमलेश बिचे, विनायक परदेशी, अथर्व कुलकर्णी, श्रुती भोसले, दिनेश साबळे यांचा समावेश होता.पुढे बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, संयुक्त महाराष्ट्राचा सुवर्ण कलश आणणारे राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी कला व संस्कृती जपणाऱ्या कलाकारांनी योग्य मान सन्मान दिला, राज्याची संकृती जपण्याचे काम या लोकांनी केले. चव्हाण साहेबांचा आदर्श घेऊन आम्ही सांस्कृतिक क्षेत्राच्या समस्या सोडवण्याच्या, कलावंत, साहित्यिकांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करत असतो, राज्यकर्ते म्हणून ते आमचे कर्तव्य आहे.

पुरस्कार मिळालेल्या सर्व कलावंताचे अभिनंदन करताना अजित पवारांनी संकर्षण कऱ्हाडे यांच्या एका व्हायरल कवितेचा संदर्भ घेत मी शेतकरी असून आजही शेतात राबतो मी पोल्ट्रीत पण काम केले आहे भाऊसाहेब भोईर तेव्हा लहान होते त्यांचे वडील सोपानराव भोईर यांनी पाहिले आहे.असे नमूद केल मी ठरवून राजकारणात आलो नाही, माझ्या स्पष्ट बोलण्याने मी राजकारणात टिकणार नाही असे अनेकांचे मत होते

मात्र माझा हाच स्वभाव सामान्य जनतेला भावणार याची मला सल्ला देणाऱ्यांना कल्पना नसावी असेही त्यांनी नमूद केले.

# भाजप मंडल आयोजित श्रावण महोत्सवाला उदंड प्रतिसाद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी : हिंदू संस्कृती मध्ये श्रावण महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. श्रावणात विविध धार्मिक व्रत वैकल्ये केली जातात. तसेच महिला अनेक सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून निसर्ग आणि परमेश्वराप्रती कृतज्ञता व्यक्त करतात. अशा सांस्कृतिक कार्यक्रमांतून पुढच्या पिढीसाठी संस्कृती जतन करण्यासाठी मार्गदर्शन मिळते असे मत आमदार उमा खापरे यांनी व्यक्त केले.

भारतीय जनता पक्ष चिंचवड प्राधिकरण मंडलाच्या वतीने सावरकर भवन येथे श्रावण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये भजन स्पर्धा, मंगळागौर खेळ, जेष्ठ नागरिकांसाठी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेतील विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम, प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी भाजपचे पिंपरी चिंचवड शहर जिल्हाध्यक्ष शत्रुघ्न काटे, माजी आमदार अश्विनी जगताप, माजी उपमहापौर शैलजा मोरे, शर्मिला बाबर, केशव घोळवे, सलीम सीकलगार, अतुल इनामदार, अरुण थोरात, सरचिटणीस संजय मंगोडेकर, सरचिटणीस शैला मोळक, माजी पक्षनेते नामदेव ढाके, संयोजक जयदीप खापरे, राधिका बोरलीकर, दिपाली धानोरकर, नीता कुशारे, राजू बाबर, सिध्देश शिंदे, अनिरूद्ध संकपाळ आदी उपस्थित होते. दरम्यान कार्यक्रमाचे उद्घाटनशैलजा मोरे, जयदीप खापरे, अनुप मोरे, सुशांत मोहिते, राधिका बोरलीकर, शर्मिला महाजन यांच्या हस्ते करण्यात आले.

**स्पर्धेचा सविस्तर निकाल खालील प्रमाणे -**

भजन स्पर्धा - प्रथम क्रमांक - गजानन भजनी मंडळ, प्राधिकरण, गायत्री भजनी मंडळ, चिंचवड; द्वितीय क्रमांक - सुखदा भजनी मंडळ, प्राधिकरण, स्वर शांती भक्ती मंडळ, प्राधिकरण; तृतीय क्रमांक - गुरूदत्त भजनी मंडळ, देहूगाव, दत्त प्रासादिक भजनी मंडळ, प्राधिकरण;

मंगळागौर खेळ - प्रथम - शालिनी ग्रुप, द्वितीय - संस्कृती ग्रुप, तृतीय - सिद्धलक्ष्मी ग्रुप, उत्तेजनार्थ - रण रागिणी ग्रुप यांचा गौरव करण्यात आला.

स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून - ज्ञानेश्वर इटकर, जगताप, विनिता जोशी, प्रविण कुरळकर, विद्या दंडवते, प्राजक्ता निफाडकर यांनी जबाबदारी सांभाळली.

कार्यक्रमाचे आयोजन जयदीप खापरे, अनुप मोरे, ज्योती कानिटकर यांनी केले होते. शर्मिला महाजन यांनी सूत्रसंचालन केले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579